# परिशिष्टे

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

## परिशिष्ट - अ

## हिन्दी अध्यापकोंके लिए प्रश्नावली

## हिंदीच्या अध्यापकांसाठी प्रश्नावली

**संशोधन विषय :**

" मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या हिंदी भाषेच्या उच्चारणांतील त्रुटींचा व लेखनातील चुकांचा चिकित्सात्मक अभ्यास."

**प्रश्नावली भरण्याविषयी सूचना :**

१) काही प्रश्नांच्या विधानापुढे होय किंवा नाही असे दोन पर्याय आहेत. त्यापैकी योग्य पर्याय ठेवावा, नको असलेल्या पर्यायावर फुली मारावी.

२) काही ठिकाणी कारणे दिलेली आहेत. योग्य कारणांपुढे ( ) अशी खूण करावी.

३) दिलेली कारणे-विधाने-त्रुटी यांच्या व्यतिरिक्त अधिक माहिती द्यावयाची असल्यास ती त्या प्रश्नाखाली मोकळ्या सोडलेल्या जागी थोडक्यात द्यावी.

-000- -000- -000- -000- -000-

१) अध्यापकाचे नाव : - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

२) शाळेचे नाव व पत्ता : - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

३) शैक्षणिक पात्रता : - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

४) पदवी-पदव्युत्तर परीक्षेचा मुख्य विषय : - - - - - - - - - - - - - -

५) बी.एड्.ला असलेली अध्यापनपध्दती : - - - - - - - - - - - - - - - -

६) हिंदी अध्यापनविषयक एखादी इतर परीक्षा (उदा. हिंदी शिक्षक सनद, कोविद इत्यादी) दिली असल्यास तिचे नाव - - - - - - - - - - - -

७) माध्यमिक शाळेत हिंदी विषय शिकविण्याचा अनुभव : - - - - - - - - - - - - - - - -

८) (अ) मराठी भाषिक विद्यार्थी हिंदी बोलताना उच्चारणाच्या ज्या चुका करतात त्यापैकी काही चुका पुढे दिलेल्या आहेत. आपण सहमत असलेल्या चुकांपुढे बरोबर (   ) अशी खूण करावी.

१. अक्षराचा चुकीचा उच्चार (उदा. न च्या ठिकाणी ण व ण च्या ठिकाणी न (उदा. कारन, स्मरन, पाणी इ.) : :

२. ऱ्हस्वाच्या ठिकाणी दीर्घ व दीर्घाच्या ठिकाणी ऱ्हस्व उच्चार (उदा. क्योंकी, पुछना, चींता, बुनन पिछे, उँचा इ.) : :

३. शब्दामागे इ जोडण्याची चूक (उदा. इस्त्री, इस्कूल इ.) : :

४. लेखनाबरहुकूम उच्चार करतात. (उदा. लिहिताना 'बहुत' असे लिहितात परंतु उच्चारताना 'बहोत' ऐवजी बहुत उच्चारतात) : :

५. ध्वन्यात्मक चूक करणे (उदा. उलटा, पलटा उच्चारताना उल्टा, पल्टा उच्चारतात) : :

६. 'श' च्या ठिकाणी 'ष' च्या उच्चार करणे (उदा. प्रकाष, वर्षा इ. उच्चारतात) : :

(आ) या व्यतिरिक्त चुका आढळत असल्यास त्या येथे सोदाहरण नमूद करावयात.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

९) पुढे नमूद केलेल्या कारणांपैकी कोणती कारणे उच्चारण दोषांची असू शकतील ?

| | |
|---|---|
| १. शाळेव्यतिरिक्त अन्यत्र मुलांभोवती हिंदीचे वातावरण नाही. | होय-नाही |
| २. शुध्द आणि स्पष्ट शब्दोच्चारांची मुलांना श्रवण-संधी नाही. | होय-नाही |
| ३. मराठी मातृभाषेचा परिणाम विद्यार्थ्यांच्या उच्चारणावर होतो. | होय-नाही |
| ४. ग्रामीण शब्दोच्चारांच्या अनौपचारिक संस्कारामुळे उच्चारण दोष होतात. | होय-नाही |
| ५. शाळेत मुलांचे उच्चारण दोष सुधारण्यासाठी पुरेशा तासिका नाहीत. | होय-नाही |
| ६. मुलांना वाचनाची अधिकाधिक संधी दिली जात नाही. | होय-नाही |
| ७. विद्यार्थ्यांचे उच्चारण दोष सुधारण्याच्यादृष्टीने व्यक्तिगत लक्ष दिले जात नाही. | होय-नाही |
| ८. विरामचिन्हांचा उचित उपयोग केला जात नाही. | होय-नाही |
| ९. दूरदर्शन, आकाशवाणी, चित्रपट इत्यादींतून हिंदी श्रवण अधिक त्यामुळे हिंदी विषय सोपा वाटतो व त्याकडे दुर्लक्ष होते. | होय-नाही |

१०. काही विद्यार्थ्यांच्या जिव्हा दोषामुळेसुध्दा उच्चारणावर परिणाम होतो. होय-नाही

११. लिहिलेल्या शब्दांचा उच्चार जसाच्या तसा केला जातो. होय-नाही

वर नमूद केलेल्या कारणां व्यतिरिक्त आणखी काही कारणे असल्यास ती येथे नमूद करावीत :

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१०) विद्यार्थ्यांच्या उच्चारणांमध्ये चुका होऊ नयेत यासाठी खालीलपैकी कोणती उपाययोजना करता येईल ?

१. विद्यार्थ्यांची उच्चारण स्पर्धा घेणे.
२. भाषण व संवाद स्पर्धा घेणे.
३. योग्य उच्चारणांसाठी ध्वनियंत्राच्या चित्रांची माहिती देणे.
४. विद्यार्थ्यांच्या उच्चारणांकडे व्यक्तिगत लक्ष देणे.
५. स्वराघात व विरामचिन्हांचा उपयोग करण्यासाठी विद्यार्थ्यांचा सतत अभ्यास घेणे.
६. अध्यापनामध्ये पुनरावृत्तीच्या नियमांचे पालन करणे.
७. शिक्षकांनी आपले सुस्वर वाचन अधिक 'आदर्श' करण्याचा प्रयत्न करणे.
८. विद्यार्थ्यांचे उच्चार कसे अशुध्द आहेत, हे टेपरेकॉर्डरवर ध्वनिमुद्रित करून दाखवावे, त्याचप्रमाणे शुध्द कसे असावेत, हेही दाखवावे.
९. दूरदर्शन, आकाशवाणीद्वारे अधिकाधिक श्रवणसंधी विद्यार्थ्यांना देणे.

वर न दिलेली परंतु उपयुक्त होईल अशी आणखी काही उपाययोजना सुचवावयाची असेल तर ती येथे लिहावी.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

११) (अ) मराठी भाषिक विद्यार्थी हिंदी लिहिताना लेखनाच्या ज्या चुका करतात, त्यापैकी काही पुढे दिलेल्या आहेत. आपण सहमत असलेल्या चुकांपुढे बरोबर (  ) अशी खूण करावी.

| | | |
|---|---|---|
| १. ऱ्हस्व दीर्घाच्या चुका लेखनामध्ये केल्या जातात. (उदा. इ आणि ई, उ आणि ऊ, उँचा, कइ, प्रतिक, क्वी, फुल इ.) | : | : |
| २. आवश्यक अनुस्वारांना गाळणे व अनावश्यक तेथे अनुस्वार देणे. उदा. गगा, सोंचने, नही, हमें, तुम्हे इ. | : | : |
| ३. ए, ऐ, ला मात्रा देण्यामध्ये चुका करणे. अनेक विद्यार्थी ए च्या ठिकाणी ऐ लिहितात. (उदा. ऐनक, ऐसा, लिऐ, नऐ) | : | : |
| ४. चुकीची अक्षर लिहिणे - उदा. पसंदच्या ठिकाणी पसंत, कागद च्या ठिकाणी कागद इ. | : | : |
| ५. उच्चारणाप्रमाणेच काही शब्द लिहिणे. (उदा. वो, बहोत, ये, पहेला इ.) | : | : |

(आ) या व्यतिरिक्त चुका आढळत असल्यास त्या येथे सोदाहरण नमूद कराव्यात :

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१२) आपल्या मते पुढे नमूद केलेल्या कारणांपैकी कोणती कारणे लेखन-दोषांची आहेत ?

१. विद्यार्थी लेखन अवधानपूर्वक करीत नाहीत. होय-नाही

२. विद्यार्थ्यांच्या लेखनाकडे व्यक्तिगत लक्ष दिले जात नाही. होय-नाही

३. उचित लेखनासाठी मार्गदर्शनाचा अभाव दिसून येतो. होय-नाही

४. मातृभाषेचा हिंदी लेखनावर परिणाम होतो, त्यामुळे लेखनात चुका होतात. होय-नाही

५. काही हिंदी शब्दांचे उच्चार जसे असतील तसे लिहिले जातात. होय-नाही

६. ए, ऐ, ओ, औ, इ. ना मात्रा देण्यामध्ये चुका होतात. होय-नाही

७. संयुक्त अक्षरे लिहिता येत नाहीत. होय-नाही

वर दिलेल्या कारणांव्यतिरिक्त लेखनातील चुकांची आणखी काही कारणे असल्यास ती येथे नमूद करावीत :

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१३) विद्यार्थ्यांच्या हिंदी लेखनामध्ये चुका होऊ नयेत यासाठी खालीलपैकी कोणती उपाययोजना करता येईल ?

१. श्रुत लेखन व अनुलेखनासाठी वेळापत्रकामध्ये स्वतंत्र तासिका ठेवणे.

२. विद्यार्थ्यांच्या लेखनाकडे व्यक्तिगत लक्ष देणे व उचित मार्गदर्शन करणे.

३. निबंधाचे आदर्श नमुने विद्यार्थ्यांसमोर ठेवणे.

४. विद्यार्थ्यांची निबंधस्पर्धा ठेवणे.

५. वारंवार ज्या शब्दांच्या चुका होतील त्या शब्दांचा तक्ता तयार करून वर्गात लावणे.

६. शुध्दलेखनाच्या नियमांचा तक्ता सोदाहरण तयार करून वर्गात सर्वांना सहज दिसेल अशा जागी लावणे.

७. मातृभाषेच्या प्रभावामुळे जे विद्यार्थी लेखनामध्ये चुका करतात, त्या दूर करण्यासाठी दोन्ही शब्दांतील फरक समजावून सांगणे.

८. हिंदीच्या -हस्व-दीर्घ शब्दांची सूची तयार करून वर्गामध्ये लावणे.

९. मराठी व हिंदी शब्दांचे लिंगभेद स्पष्ट करणे.

१०. विद्यार्थ्यांचे उच्चारण सदोष असल्यास लेखनही सदोष होते म्हणून उच्चारणांकडे लक्ष देणे.

११. शुध्दलेखनासाठी काही गुण ठेवावेत. गुण प्राप्त करण्यासाठी विद्यार्थी शुध्दलेखनाचा प्रयत्न करतील.

१२. शिक्षक जेव्हा आदर्श वाचन करतात, तेव्हा विद्यार्थ्यांनी धड्यामध्ये किंवा कवितेमध्ये विशिष्ट शब्द कसा लिहिला आहे याचे निरीक्षण केल्यास लेखनदोष कमी होतील. यासाठी अध्यापकांनी मार्गदर्शन करणे.

वर न आलेली परंतु लेखनातील चुका सुधारण्यास उपयुक्त होईल अशी उपाय-योजना सुचत असल्यास ती खाली नमूद करावी.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१४) वरीलपैकी कोणत्याही प्रश्नात न आलेली परंतु सदर संशोधनास उपयुक्त असलेली अशी आणखी काही माहिती द्यावयाची असल्यास ती येथे नमूद करावी :

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

आपल्या सहकार्याबद्दल पुन्हा एकदा मन:पूर्वक धन्यवाद.

## परिशिष्ट - ब

### प्रश्नावली भर देनेवाले अध्यापक और उनके स्कूल

| अ.क्र. | अध्यापकोंके नाम | स्कूल के नाम |
|---|---|---|
| १) | श्रीमति भोसले एस.ए. | ब्रँच राजाराम हायस्कूल |
| २) | श्री बागवान एम.डी. | ब्रँच राजाराम हायस्कूल |
| ३) | श्रीमति मेंढे जी.एस. | महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल |
| ४) | श्रीमति भाटवडेकर व्ही.जी. | विकास हायस्कूल |
| ५) | श्री मेंडवडे एस.बी. | मेन राजाराम हायस्कूल |
| ६) | श्री चौगुले एस.व्ही. | श्री साई हायस्कूल |
| ७) | श्रीमति कुमार्षी ए.डी. | प्रि. पद्माराजे गर्ल्स हायस्कूल |
| ८) | श्री देशपांडे एम.आर. | नूतन मराठी हायस्कूल |
| ९) | श्री ढवळे आर.एम. | स.म. लोहिया हायस्कूल |
| १०) | श्रीमति देसाई एस.एस. | प्रि. इंदुमतीदेवी हायस्कूल |
| ११) | श्री जोशी व्ही.बी. | तात्यासाहेब पाटणे हायस्कूल |
| १२) | श्री जोशी जी.एस. | स.म. लोहिया हायस्कूल |
| १३) | श्रीमति जुगारे नलीनी | रा.छत्रपति शाहू महाराज हायस्कूल |
| १४) | श्रीमति कुलकर्णी यू.जी. | प्रि. पद्माराजे गर्ल्स हायस्कूल |
| १५) | श्री कुलकर्णी जी.यू. | तात्यासाहेब पाटणे हायस्कूल |
| १६) | श्रीमति कुलकर्णी ए.एस. | राजश्री. छत्रपति शाहू महाराज हायस्कूल |
| १७) | श्रीमति कुलकर्णी ए.ए. | महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल |
| १८) | श्रीमति कुलकर्णी यू.एस. | प्रायव्हेट हायस्कूल |
| १९) | श्रीमति कदम एस,एच. | नागोजीराव पाटणकर हायस्कूल |

| अ.क्र. | अध्यापकोंके नाम | स्कूल के नाम |
|---|---|---|
| २०) | श्रीमति कदम के.बी. | राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल |
| २१) | श्रीमति खांडेकर एस.एम. | राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल |
| २२) | श्रीमति कांबळे एस.डी. | राजर्षि शाहू हायस्कूल |
| २३) | श्री कट्टी एस.आर. | स.म. लोहिया हायस्कूल |
| २४) | श्रीमति मनियार एस.एम. | नेहरू हायस्कूल |
| २५) | श्रीमति पाटील एस.जी. | विक्रम हायस्कूल |
| २६) | श्री शेख वाय. आय. | मैन राजाराम हायस्कूल |
| २७) | श्री सकपाळ बी.एच. | वि.स. खांडेकर हायस्कूल |
| २८) | श्रीमति शहाणे एस.एम. | गुरूदेव विद्यानिकेतन, फुलेवाडी |
| २९) | श्रीमति साखरपे पी.व्ही. | शिवशक्ति हायस्कूल |
| ३०) | श्रीमति वैद्य ए.व्ही. | उषाराजे हायस्कूल |

# परिशिष्ट - क

## इण्टरव्यू (साक्षात्कार) देनेवाले अध्यापक और उनके स्कूल्स

| अ.क्र. | अध्यापकका नाम | स्कूलका नाम |
|---|---|---|
| १) | श्रीमति माटवडेकर व्ही.जी. | विकास हायस्कूल |
| २) | श्रीमति मेंडे जी.एस. | एम.एल.जी. हायस्कूल |
| ३) | श्रीमति दुमाणी ए.डी. | प्रि. पद्माराजे गर्ल्स हायस्कूल |
| ४) | श्री ढवळे आर.एम. | स.म. लोहिया हायस्कूल |
| ५) | श्रीमति देसाई एस.एम. | प्रि. इंदुमतीदेवी हायस्कूल |
| ६) | श्रीमति कुलकर्णी यू.जी. | प्रि. पद्माराजे गर्ल्स हायस्कूल |
| ७) | श्रीमति कुलकर्णी ए.ए. | एम.एल.जी. हायस्कूल |
| ८) | श्रीमति कुलकर्णी यू.एस. | प्रायव्हेट हायस्कूल |
| ९) | श्रीमति खांडेकर एस.एम. | राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल |
| १०) | श्रीमति मनियार एस.एम. | नेहरू हायस्कूल |
| ११) | श्रीमति पाटील एस.जी. | विक्रम हायस्कूल |
| १२) | श्री शेख वाय.आय. | मेन राजाराम हायस्कूल. |

## परिशिष्ट - ड

## हिन्दीका द्वितीय स्तरपर आधारित अभ्यासक्रम
## (५ वी से ७ वी)

हिंदी (पूर्ण व संयुक्त)
(द्वितीय-तृतीय भाषा)

१) हिंदी द्वितीय-तृतीय भाषेच्या स्तरावर हिंदी भाषेचा पाठ्यक्रम तयार करण्यासंबंधी मार्गदर्शक तत्वे :

राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, प्रशासनिक, राजकीय, व्यावसायिक आणि सर्वसामान्यपणे व्यावहारिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने शिक्षण क्षेत्रातील शालेय शिक्षणाच्या एका विशिष्ट पातळीवर द्वितीय भाषा म्हणून हिंदीच्या शिक्षणाला आरंभ केला जातो. भाषेच्या ज्ञानार्जनाची ही यत्नसाध्य प्रक्रिया आहे.

हिंदी ही द्वितीय भाषा म्हणून शिकण्यास सुरुवात करण्यापूर्वी विद्यार्थ्याला त्याच्या स्वत:च्या मातृभाषेतील हजारएक शब्द, व्याकरणाच्या दृष्टीने वाक्यरचना करणे व विशिष्ट शब्द वगैरेचा वाक्यात बिनचूक उपयोग करणे इत्यादी गोष्टी आत्मसात झालेल्या असतात. आता या नव्या पातळीवर त्याला स्वत:च्या भाषिक जगतातून दुसऱ्या भाषिक जगतात पदार्पण करावयाचे असते. या प्रक्रियेत त्याला दुसरी भाषा शिकताना, त्या भाषेतील विचार ऐकताना, बोलताना, लिहिताना आणि वाचताना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते.

भारतासारख्या बहुभाषी राष्ट्रात विभिन्न भाषा-भाषी लोकांना आपापसात व्यवहार करण्याच्या दृष्टीने संपर्क भाषा म्हणून व्यापक स्वरूपात

हिंदी भाषेच्या शिक्षणाचे व तिच्या प्रचार-प्रसाराचे महत्व फारच मोठे आहे ही गोष्ट सर्व विचारवंतांनी आणि शिक्षण शास्त्रज्ञांनी वेळोवेळी मान्य केलेली आहे. अनेक शिक्षण आयोगांनी हिंदी भाषेच्या शिक्षणाच्या महत्त्वावर पुरेसा जोर दिला आहे. भारताच्या राज्यघटनेतील तरतुदीप्रमाणेही राष्ट्रीय पातळीवर विचार-विनिमय, प्रशासन, शिक्षण, व्यापार, संचार व पर्यटन यांच्या दृष्टीने हिंदी भाषेचा प्रचार-प्रसार जितका लवकर होऊ शकेल, तितकाच तो राष्ट्राच्या दृष्टीने हितकारक ठरेल.

अहिंदी भाषी विद्यार्थ्यांनी हिंदीचे अध्ययन करणे आणि त्याचबरोबर हिंदी भाषी विद्यार्थ्यांनी कोणत्या तरी एका अन्य भारतीय भाषेचे अध्ययन करणे ही गोष्ट हिंदीसह सर्वच भारतीय भाषांच्या भाषिक आणि साहित्यिक समृध्दीच्या दृष्टीने आवश्यक आहे. संपूर्ण देशात राष्ट्रीय एकात्मतेची भावना विकसित व्हावी या दृष्टीने हिंदीच्या शिक्षणाचा हातभार अत्यंत मोलाचा ठरेल.

राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरणानुसार शालेय पातळीवर प्रत्येक विद्यार्थ्याला द्वितीय भाषा म्हणून हिंदी भाषा प्राथमिक शाळेच्या कोणत्याही वर्गापासून शिकविली जाऊ शकते. तथापि महाराष्ट्रात हिंदीचे अध्ययन-अध्यापन पाचव्या इयत्तेपासून सुरू केले जावे, असे निश्चित करण्यात आले आहे.

" राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषद " या संस्थेने राष्ट्रीय शिक्षण क्रमाचा जो आराखडा तयार केला आहे, त्याचप्रमाणे दोन भारतीय भाषा आणि इंग्रजी अशा एकूण तीन भाषांचे शिक्षण दहाव्या यत्तेपर्यन्त घावयास हवे.

या व्यवस्थेनुसार हिंदीच्या द्वितीय-तृतीय स्तरावर अध्ययनासाठी सहा वर्षापर्यन्यचा कालावधी उपलब्ध होऊ शकेल.

अहिंदी भाषी भारतीय विद्यार्थ्यांना हिंदी ही काही अगदी नवीन भाषा आहे, असे मुळीच नाही. द्वितीय भाषा किंवा तृतीय भाषा म्हणून हिंदीच्या शिक्षणाच्या दृष्टीने ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. सिनेमा, दूरदर्शन, रेडिओ, तसेच इतर वेगवेगळ्या कारणांनी लोकांना करावा लागणारा प्रवास इत्यादींमुळे हिंदी आता एखाद्या परदेशी भाषेप्रमाणे परकीय भाषा अशी मुळीच वाटत नाही. त्याचप्रमाणे हिंदी व इतर भारतीय भाषा यांच्या शब्द-संपत्तीत तसेच वाक्यरचना, इत्यादीत जे साम्य आहे, त्यांचा हिंदी शिक्षणाच्या क्षेत्रात पूर्ण लाभ करून घेतला पाहिजे. सध्या अहिंदी भाषी राज्यांपैकी काही राज्यांत हिंदी द्वितीय भाषा म्हणून व काही राज्यांत तृतीय भाषा म्हणून शिकविली जात आहे. पण या सर्वच राज्यांत हिंदीच्या शिक्षणाच्या दृष्टीने एकरूपता आणणे इष्ट ठरेल. या दृष्टीने (अपवाद सोडून) प्रत्येक राज्यात हिंदीच्या शिक्षणाला कमीत कमी ५-६ वर्षे मिळू शकतील. कोणत्याही भाषेच्या व्यवहारात नैपुण्य प्राप्त होणे हे त्या भाषेच्या शिक्षणाला दिल्या जाणाऱ्या एकूण वेळावर अवलंबून असते. यादृष्टीने हिंदीच्या शिक्षणाला प्रत्येक आठवड्यात जितक्या अधिक तासिका दिल्या जातील तितके ते फायद्याचे ठरेल. सर्वसाधारणपणे प्रत्येक आठवड्यात कमीत कमी ४ आणि संपूर्ण वर्षात सुमारे १२० तासिका विद्यार्थ्यांना हिंदी शिकण्यासाठी दिल्या पाहिजेत. प्रत्येक वर्गासाठी आखण्यात येणारा क्रमबद्ध अभ्यासक्रम हा हिंदीच्या शिक्षणासाठी त्या त्या वर्गाला दिल्या जाणाऱ्या तासिकांच्या संख्येशी सुसंगत असा असावयास हवा.

निम्न प्राथमिक, उच्च प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील वर्गांना हिंदी भाषा ज्या सर्वसामान्य उद्देशांनी शिकवावयाची सोय आहे, ते उद्देश प्रथम सुस्पष्ट करून घ्यावयास हवेत. आणि प्रत्येक पातळीवर हिंदी भाषेची भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी या मुख्य प्रक्रियांमध्ये हिंदी भाषेच्या शिक्षणाचे धोरण व्यावहारिक पातळीवर क्रमाक्रमाने राबविले पाहिजे.

उद्दिष्टे :

निम्न प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गांमध्ये द्वितीय-तृतीय भाषा हिंदीच्या शिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्टे -

विद्यार्थ्यांची पुढील बाबतीत क्षमता वाढविणे -

१) हिंदीचे शुध्द उच्चार
२) हिंदीत सोप्या विषयावर संभाषण
३) प्रामुख्याने सोप्या हिंदीतील गद्य उतारे, गोष्टी, संवाद, तसेच सोप्या कविता, अर्थबोधासह वाचणे
४) हिंदीत पत्र लिहिणे
५) व्यावहारिक हिंदी व्याकरणाची तोंडओळख
६) हिंदीतून मातृभाषेत सोप्या मजकुराचा अनुवाद करणे
७) अभ्यासलेल्या हिंदी शब्दसंग्रहांच्या अनुषंगाने बालसाहित्य वाचणे.
८) चित्रपट, रेडिओ, आणि दूरदर्शनचे कार्यक्रम ऐकून व पाहून मनोरंजन व ज्ञानार्जन करण्याची क्षमता वाढविणे.
९) भारताच्या सर्वसमावेशक व विविधतेने नटलेल्या समन्वयात्मक संस्कृतीचा स्थूलमानाने परिचय करून देणे व त्यांच्यात राष्ट्रीय भावना जागृत करणे.
१०) भारताच्या राष्ट्रीय जीवनातील हिंदीचे महत्त्व समजावून देणे.

प्राथमिक स्तरावर इयत्ता, ५, ६, ७, ८ मधील भाषिक कौशल्यांच्या पूर्तीसाठी -

क) ऐकणे व बोलणे याबाबत अपेक्षित क्षमता -

१) हिंदीतील ध्वनि-उच्चार ऐकून मातृभाषेतील जवळ जवळ सारख्या असलेल्या ध्वनि-उच्चारांशी तुलना करता येणे :

उदा. इ-ई, उ-ऊ, ए-ऐ, ओ-औ

अल्पप्राण, महाप्राण, घोष, अघोष

अनुस्वार - अनुनासिक, निरनुनासिक, अर्ध-अनुस्वार (चंद्रबिंदु) :

| | |
|---|---|
| ष - ख | क्ष - छ |
| ध - क्ष | ड - ढ |
| ड - ढ | ड - ड़  ढ - ढ़ |
| ब - व | य - ज, स - श - ष |

इत्यादींकडे अधिक लक्ष पुरविणे.

२) हिंदीतील सर्व प्रकारच्या ध्वनींचा स्वतंत्रपणे व स्पष्ट मानक शब्दात उच्चार करता येणे.

३) संयुक्ताक्षरयुक्त शब्दांचा शुध्द उच्चार करता येणे.

४) बोलताना लय, ताल, बलाघात, इत्यादींचा सुयोग्य उपयोग करता येणे.

५) व्याकरणशुध्द वाक्य बोलता येणे.

६) हिंदीत दिल्या गेलेल्या सामान्य सूचनांचा अर्थ समजणे.

७) सोप्या विषयावरील सर्वसामान्य संभाषणात भाग घेता येणे.

८) हिंदीत सोप्या कविता आणि गोष्टी सांगता येणे.

९) ओळखीच्या किंवा अनोळखी व्यक्तींना आपले म्हणणे हिंदीतून समजावून सांगणे.

१०) हिंदीतील सोप्या संवाद-कार्यक्रमात सक्रिय भाग घेणे.

११) चित्रपट (फिल्म), दूरदर्शन व रेडिओचे हिंदी कार्यक्रम व ज्ञानार्जन करण्यासाठी ऐकणे आणि पाहणे.

ब) वाचणे व समजणे याबाबत अपेक्षित क्षमता -

१) हिंदीतील सर्व लिपि-संकेत समजणे.

२) हिंदीतील शब्द आणि वाक्ये शुध्द उच्चारांसह वाचता येणे.

३) सुवाच्च लेखन असलेली पत्रे इ. मजकूर वाचता येणे.

४) सोपे संवाद असलेले पाठ, गोष्टी, रोचक निबंध, प्राण्यांची वर्णने इत्यादी अर्थबोधासह समजून वाचता येणे.

५) पाठयवस्तूत अंतर्भूत असलेल्या मध्यवर्ती कल्पना आणि विशेष सूचना किंवा विचारासंबंधी अंश शोधून काढता येणे.

६) वाचलेल्या मजकुरावर आधारित प्रश्नांची उत्तरे देता येणे.

ग) अपेक्षित लेखन क्षमता -

१) हिंदीतील सर्व ध्वनि-चिन्हे आणि त्यायोगे बनलेल्या शब्दांचे सुवाच्च लेखन करता येणे.

२) परिचित शब्द वर्तनी मान्य लेखन पध्दतीच्या नियमानुसार शुध्द लिहिता येणे.

३) सोप्या विषयावर काही वाक्ये किंवा एक दोन परिच्छेद लिहिता येणे.

४) हिंदीत पत्र लिहिता येणे.

५) चित्रांच्या आधारे किंवा मुद्यावरुन गोष्ट लिहिता येणे.

६) व्याकरणदृष्टया शुध्द भाषेचा उपयोग करता येणे.

७) हिंदीतून मातृभाषेत भाषांतर करतायेणे.

उद्दिष्टांच्या पूर्तीच्या दृष्टीने काही सूचना :

१) भाषा-व्यवहार म्हणजे मुख्यत्वेकरुन श्रवण आणि भाषण या क्रियांचे क्षेत्र होय. यापुढील क्षेत्र म्हणजे वाचन आणि लेखन. परंतु भाषा शिक्षणाच्या व्यवहारात मात्र याच्या उलट स्थिती असलेली दिसते. भाषा-शिक्षण क्षेत्रात श्रवण आणि भाषण या अवस्था वाचन लेखनानंतर येतात, असे आजचे चित्र आढळते. भाषेच्या परीक्षांमध्ये मुख्यत: वाचन आणि लेखन यांचीच

परीक्षा घेतली जाते, बहुधा त्याचे हे कारण असावे. आपल्या परीक्षा पध्दतीत श्रवण व भाषण यामध्ये विद्यार्थ्यांने किती नैपुण्य प्राप्त केले आहे, याचे मूल्यमापन करावयास आज फारसा वाव नाही. ही गोष्ट दुर्दैवाची आहे आणि ती बदलावयास हवी.

२) भाषिक व्यवहाराच्या सरावानेच भाषा आत्मसात केली जाते. म्हणून या बाबतीत विद्यार्थ्यांना अधिकाधिक क्रियाशील ठेवावयास हवे. भाषा शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेत विद्यार्थ्यांना शिक्षकांचे मौखिक अनुकरण करावयास हवे. परिणामत: ते हळूहळू स्वत:च शब्द आणि वाक्य बोलू लागतील. विद्यार्थ्यांना हिंदी बोलण्याची संधी जितकी अधिक मिळेल, तितकीच अधिक योग्यता ते हिंदी भाषेचा वापर करण्यात संपादन करू शकतील.

३) सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांच्या शुध्द उच्चाराकडे लक्ष द्यावयास हवे. त्यांच्या मातृभाषेच्या उच्चार पध्दतीचा परिणाम सुरुवातीला त्यांच्या हिंदीच्या उच्चारांवर होत असलेला दिसेल. तरी पण त्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या उच्चारातील दोष यत्नपूर्वक हळूहळू दूर केले जाऊ शकतील.

४) सुरुवातीला काही दिवस फक्त मौखिक शिक्षण द्यावे. त्यानंतर जेथे विद्यार्थ्यांना देवनागरी लिपीची ओळख नाही अशा महाराष्ट्रातील काही शाळांमध्ये या लिपीची ओळख करून द्यावी. तसेच या लिपी चिन्हांपासून बनणारे शब्द आणि वाक्ये यांचा सराव करून घ्यावा. वाचनाचा काही दिवस सराव करून झाल्यावर विद्यार्थ्यांना लिहिण्याचाही सराव होईल.

५) भाषा शिक्षणात पाठ्यपुस्तके, अभ्यासपुस्तिका व इतर सहाय्यक शैक्षणिक साधने यांचा भरपूर उपयोग करून घेतला पाहिजे. वर्गातील शैक्षणिक कार्यक्रमांशिवाय, वर्गाबाहेर प्रार्थना, सभा क्रीडांगण व इतर अनौपचारिक प्रसंग यात विद्यार्थ्यांना हिंदीत बोलण्याच्यादृष्टीने संधी देऊन त्यांना या बाबतीत अधिकाधिक

उत्तेजन द्यावयास हवे. रेडिओ, दूरदर्शन इत्यादी माध्यमांतून प्रसारित होणारे कार्यक्रम ऐकविले व दाखविले पाहिजेत.

तसेच हिंदीत प्रकाशित होणाऱ्या बालसाहित्य पत्रिकात आलेल्या सरळ व सोप्या हिंदीत लिहिलेल्या गोष्टी व कविता. संकलित कराव्यात आणि त्या शाळेच्या भित्ति-फलकावर किंवा फ्लॅनेल बोर्डावर प्रदर्शित कराव्यात.

तात्पर्य, हिंदी भाषा शिकण्याच्या आणि शिकविण्याच्या दृष्टीने जितकी संधी मिळेल तितकी घेऊन तिचा अधिकाधिक फायदा करून घेतला पाहिजे.

हिंदीच्या अध्यापन-प्रणालीचे अंतिम स्वरूप हिंदी भाषा शिकविणारे शिक्षकच आपापल्या प्रादेशिक गरजा लक्षात घेऊनच निश्चित करू शकतील.

पाठ्यपुस्तके, अभ्यासपुस्तिका, लेखनपुस्तिका, सचित्राधार पत्रे इत्यादी शैक्षणिक साधनसामग्री शिक्षकांना आपले कार्य करीत असताना फक्त सहाय्यक म्हणूनच सिध्द होणारी आहे. ती भाषा शिक्षकांचे व्यक्तिमत्व आणि अध्यापन कार्यासंबंधी सारासार विवेक यांचे स्थान घेऊ शकणार नाही. भाषेच्या परिणामकारक अध्यापनाच्या दृष्टीने शिक्षकाला आपल्यासाठी अध्यापनसामग्री स्वत:च वाढवावी लागेल. वर्गातील वातावरण जर प्रतिसादात्मक असेल व विद्यार्थ्यांना निरनिराळ्या प्रसंगी हिंदीत बोलण्याला अधिकाधिक संधी उपलब्ध करून दिली जाऊ शकेल, तर विद्यार्थ्यांचे भाषा व्यवहारातील कौशल्य विकसित होण्यात कोणतीच अडचण येणार नाही. यासाठी वर्गात विद्यार्थ्यांना हिंदीत अधिकाधिक संभाषण करण्याची संधी मिळेल. या दृष्टीने प्रयत्न करावयास हवा. यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांच्यात आणि विद्यार्थ्यांमध्ये आपापसात हिंदीत प्रश्नोत्तरे होतील अशी संधी उपलब्ध करून द्यावयास हवी.

बऱ्याचशा भारतीय भाषांच्या शब्दसंपत्तीत बरेच शब्द समान आहेत, म्हणून विद्यार्थ्यांची हिंदी शब्दसंपत्ती जलद गतीने विकसित होऊ शकेल. परंतु या भाषात कित्येक शब्द असेही आहेत की ते अक्षरांच्या दृष्टीने समान असूनही

अर्थाच्यादृष्टीने त्यात वेगळेपणा आढळतो. अशा समयी पण भिन्नार्थी शब्दांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घ्यावयास हवे. शेवटी आणखी एक मुद्दा सांगावयाचा म्हणजे द्वितीय-तृतीय भाषा म्हणून हिंदी शिकविली जात असताना हिंदी भाषेच्या अध्ययन आणि अध्यापनाची वाटचाल मातृभाषेच्या अध्यापनाच्या तुलनेत काही अंशी मंदावण्याची शक्यता ह आहे. ही गती हळूहळू वाढवावी, यादृष्टीने हिंदीच्या शिक्षकांनी आपापल्या अध्यापनकार्याचे नियोजन काळजीपूर्वक आणि यत्नपूर्वक करणे आवश्यक आहे. कोणत्याही भाषेवर प्रभुत्व प्राप्त करण्याचा एकमेव उपाय जर कोणता असेल तर तो हा की त्या भाषेचा सतत अभ्यास करीत राहणे. हा सराव जितका अधिक रोचक आणि प्रसंगानुरूप असेल तितक्याच शीघ्र गतीने विद्यार्थ्यांना भाषिक ज्ञानार्जन करून घेता येईल.

<u>द्वितीय-तृतीय भाषास्तरावर हिंदीचा पूर्ण व संयुक्त पाठ्यक्रम</u> :
(इयत्ता ५ वी ते ८ वी)

आपल्या मातृभाषेबरोबरच विद्यार्थ्यांनी द्वितीय-तृतीय भाषांचा अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे. भारत हा बहुभाषिक देश असल्यामुळे प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. स्वाभाविक हिंदी भाषेला संपर्क भाषा म्हणून काम करावे लागणार आहे. या भाषेच्या परिचयामुळे विद्यार्थ्यांत भावनात्मक ऐक्य वाढील लागेल. हिंदीतून बोललेले त्यांना सहज समजेल व ते हिंदीतून बोलू शकतील. हिंदी भाषिक किंवा इतर भाषिक प्रदेशात गेल्यानंतर तेथील व्यक्तीशी त्यांना संभाषण करता येईल. त्यांच्याशी जवळीक साधता येईल.

ज्या विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठी किंवा इंग्रजी आहे त्यांना इ.५ वी पासून हिंदीचा अभ्यास करावा लागेल. कोणतीही भाषा आत्मसात करावयाची म्हणजे ती चांगली ऐकता, वाचता, बोलता आणि लिहिता यायला हवी. दैनंदिन

व्यवहाराची भाषा ही सामान्य भाषा असते. त्यात मर्यादित शब्दांचा वापर केला जातो. ५ वी ते ८ वी या इयत्तांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रामुख्याने ही व्यवहारातील हिंदी भाषा चांगली अवगत झाली पाहिजे. त्यांच्या हिंदीच्या शब्दभांडारात सुमारे १५०० शब्दांचा भरणा असावयास हवा. इ. ५ वी पासून टप्प्याटप्प्याने हे शब्दभांडार समृध्द होत गेले पाहिजे.

उद्दिष्टे :

हिंदी द्वितीय भाषा म्हणून शिकविताना पुढील उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवावीत :

१) हिंदीचा संपर्क भाषा म्हणून उपयोग करण्यास मुलांनी समर्थ बनावे.
२) मुलांमध्ये आपली राष्ट्रभाषा म्हणून हिंदीबद्दल प्रेम निर्माण व्हावे.
३) मुलांमध्ये हिंदी भाषेतून भावनात्मक ऐक्य निर्माण व्हावे.
४) हिंदी भाषेत व्यक्त केलेले विचार व भावना यांचे सहजपणे आकलन करता यावे.
५) सोप्या हिंदीत संभाषण करता यावे.
६) आपले विचार सोप्या व शुध्द हिंदीत लिहिता यावेत.

क्षमता :

वर नमूद केलेली उद्दिष्टे साध्य केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमता विकसित होणे आवश्यक आहे.

१) हिंदीमध्ये दिलेल्या सामान्य सूचनांचे आकलन होणे.
२) हिंदीमध्ये व्यक्त केलेले दुसऱ्याचे विचार समजणे.

३) आपले विचार सोप्या व शुध्द हिंदीत व्यक्त करता येणे.
४) मित्र किंवा एखादी अपरिचित व्यक्ती यांच्याशी सोप्या हिंदीतून बोलता येणे.
५) हिंदी भाषेतील उच्चारांची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन शुध्द व स्पष्ट शब्दोच्चार करता येणे.
६) शुध्द उच्चार, योग्य स्वरूपात, आवाजातील चढउतार याचा योग्य मेळ साधून हिंदीतील पाठांचे वाचन करता येणे.
७) हिंदीत पारिवारिक पत्रलेखन करता येणे.
८) परिचित विषयांवर हिंदीत काही वाक्ये किंवा छोटासा परिच्छेद लिहिता येणे
९) हिंदी-संवाद, एकांकिका यात भाग घेणे.
१०) हिंदीच्या पाठ्यपुस्तकांतील उताऱ्याचा मातृभाषेत अनुवाद करता येणे.

<u>उपक्रम</u> :

या सर्व क्षमता विकसित करण्यासाठी काही अतिरिक्त उपक्रम आयोजित करावे लागतील. इ. ५ वी ते इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी पुढील उपक्रम घ्यावेत :

१) हिंदी दिवस साजरा करणे (१४ सप्टेंबर)
२) हिंदी संवाद बसवून घेणे.
३) आकाशवाणीवरील हिंदी कार्यक्रम ऐकविणे.
४) हिंदी कथाकथन स्पर्धा घेणे.
५) हिंदी कविता गायनाची-भावपूर्ण वाचनाची स्पर्धा घेणे.
६) हिंदीतील गोष्टींची सोपी पुस्तके वाचण्यास देणे.
७) समानार्थी व विरुध्दार्थी शब्दांचा संग्रह करण्यास सांगणे.
८) शब्दसमूहासाठी एक शब्द शोधून त्यांचा संग्रह करण्यास सांगणे.

९) हिंदी कथांचे नाट्यीकरण करून घेणे.

१०) दैनंदिन व्यवहारात येणाऱ्या हिंदी शब्दांचा संग्रह करण्यास सांगणे (फुले, फळे, भाज्या, धान्य इ. )

११) इयत्ता ८ वीतील विद्यार्थ्यांना हिंदीचा शब्दकोश पाहण्याचा सराव देणे.

## इयत्ता ५ वी

स्वातंत्र्यपूर्व काळात आणि त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळातही महाराष्ट्रात राष्ट्रभाषेचा अभ्यास व्हावा, या हेतूने पाचव्या इयत्तेच्या अभ्यासक्रमात हिंदी या विषयाचा समावेश करण्यात आला. वेळोवेळी अभ्यासक्रमात थोडेफार बदल करण्यात आले तरीही द्वितीय भाषा हिंदी शिक्षणाचा प्रारंभ पाचव्या य इयत्तेतच होत आला आहे.

इयत्ता सहावीच्या अगोदर इयत्ता पाचवीमध्ये द्वितीय भाषा हिंदीचा अभ्यास होण्याच्यादृष्टीने खालील तपशील देण्यात येत आहे :

१) इयत्ता पाचवीमध्ये मौखिक कार्यावर भर देण्यात यावा. तृतीय भाषा म्हणून हिंदीचे अध्यापन ज्या ठिकाणी होईल त्या ठिकाणी अक्षरे, संयुक्ताक्षरे शब्द इत्यादींच्या उच्चारांचा सराव करविणे.

२) प्रथम वर्ष पाठ्यक्रमातील निर्धारित भाषिक पाठ्यबिंदूच्या आधारे मातृभाषेतील परिचित शब्दांशी मिळत्या जुळत्या हिंदीतील केंद्रभूत शब्दांचा कुशलतेने वापर करून शिक्षकांनी संभाषण-प्रश्नोत्तर पद्धतीने या विद्यार्थ्यांना संबंधित भाषिक पाठ्यबिंदूंची ओळख करून देणे आवश्यक आहे. या वर्षीच्या विद्यार्थ्यांकडून मौखिक अभिव्यक्ती अपेक्षित आहे.

३) यातूनच विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतील अक्षरे, शब्द इत्यादींच्या हिंदीतील त्याच्या उच्चारातील वेगळेपणा लक्षात आणून देणे व त्याप्रमाणे हिंदीच्या पध्दतीने उच्चारांचा सराव करून घेणे.

४) अक्षरे, शब्द, वाक्ये इत्यादींच्या अनुलेखनाचा सराव करून घेणे. प्रामुख्याने निर्धारित भाषिक पाठ्यबिंदूंचे आकलन झाल्याची खात्री करून घेण्याच्या दृष्टीने हेतुलक्षी स्वाध्यायांचा सराव करून घेणे.

५) सुमारे आठ गेय कविता पाठ म्हणता येते.

६) सामान्य वर्तमानकाळ, सामान्य भूतकाळ, सामान्य भविष्यकाळ, आज्ञार्थक, प्रश्नार्थक वाक्ये यांच्या वाक्यरचनेचा सराव करून घेणे.

७) नामांचे एकवचन, अनेकवचन, नामांचे लिंग ओळखणे.

८) अंक - १ ते ५० अंक म्हणता येणे.

९) इयत्ता ५ वी (पाचवी) साठी हिंदी (द्वितीय भाषा) चे पाठ्य-पुस्तक खालील विषयांना धरून शब्दांचा समावेश असलेले पाठ तयार करवून घेणे.

स्वत:चा परिचय, शरीराचे अवयव, दिनक्रम, आई, मित्र, मैत्रिणी

घर

शाळा

पाळीव जनावरे - प्राण्यांचे आवाज

बाग व परिसर

कपडे

रंग

विभिन्न व्यवसाय आणि व्यवसायी

दैनिक व्यवहारातील क्रिया-बसणे, उठणे, खाणे, पिणे, चालणे, लिहिणे इत्यादी.

पूजा - प्रार्थना स्थळे - सर्वधर्म समभाव.

१०) पाठ्यपुस्तकाच्या रचनेत चित्रांवर भर देण्यात यावा. शब्द व क्रिया सूचित करणारी चित्रे वापरणे.

<u>उपक्रम</u> :

१) हिंदीमध्ये ' ज्ञ ' चा उच्चार ' ग्य ' प्रमाणे केला जातो. उदा. ' ज्ञान ' चा उच्चार ' ग्यान ' याचा सराव देणे.

२) हिंदीत ड व ढ यांचे दोन उच्चार आहेत. ज्यावेळी या दोन्ही अक्षरांच्या खाली टिंब (म्हणजेच नुक्ता) दिला असेल तेव्हा वेगळा व नसेल तेव्हा वेगळा उच्चार करावयाचा असतो, याचा सराव देणे. उदा. डरना, डाक, बड़ा, पड़ाव, ढक्कन, ढोल, पढ़ना, बढ़ई.

३) खालील उच्चारांचा विशेष सराव द्यावा.

स-ष-श - सरिता, सुषमा, सुशील बिभीषण, विशेषण

श-स - सर, शंकर, संकर

ड-ढ - कुड़, कड़ा, कढ़ाई, कड़ी, कढ़ी

ज - जरा, (थोडा) ज़रा (वृध्दत्व)

४) सोप्या हिंदीतून मुलांशी संभाषण करणे.

५) पाठ्यपुस्तकातील हिंदी कवितेचे भावपूर्ण व लयबध्द गायन-वाचन करणे.

यानुसार पाठ्यक्रमाचा आराखडा पुढीलप्रमाणे राहील.

१) गद्य - पाठ्यपुस्तकाचा आकार
पृष्ठ संख्या ३० (केवळ संहिता)

२) पद्य गेय, अभिनेय आणि बालगीते - १०
(ओळी ५०)

३) व्याकरण - फक्त स्थूल परिचय

नाम, लिंग, वचन, प्रकारांची ओळख

सर्वनाम - पुरुषवाचक

प्रश्नार्थक - कौन, क्या, कब, कहाँ

विशेषण - गुणवाचक, संख्यावाचक (१ ते ५० पर्यन्त)

आज्ञार्थक - तुम, आप

काळ - वर्तमान - सामान्य, अपूर्ण

भूत - सामान्य

भविष्य - सामान्य

उच्चारण - हिंदी पाठ्यक्रम -- वर क्र. ३ मध्ये दर्शविलेला भाग

४) रचना - (तोंडी)

मेरा परिचय, मेरा दिनक्रम, मेरी माँ, मेरा मकान, मेरी पाठशाला, मेरा मित्र-मेरी सहेली.

५) विशेष सूचना (१) ' क्रमनिर्धारित मानिक वाक्य संरचना तक्ता ' आणि ' केन्द्रभूत शब्दावली ' कृपया क्रमश: परिशिष्ट १ व २ मध्ये पहा.

(२) विद्यार्थी-केन्द्रित पाठ्यपुस्तक तयार करण्याच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार, आवडीनिवडीचा विचार करून, पाठ्यविषयींची निवड करण्यात यावी.

<u>इयत्ता ६ वी</u>

या इयत्तेत हिंदी पाठ्यपुस्तक (संहिता) सुमारे ४० पृष्ठांचे असावे. त्यात कथात्मक, संवादात्मक, वर्णनात्मक इत्यादी पाठ असावेत. गद्य पाठांव्यतिरिक्त ६० ओळींचे पद्य असावे.

हिंदीतील विशिष्ट शब्दांचे उच्चार लक्षात घेऊन तसेच अर्थ समजून घेऊन ऐकणे :

१) किमान-क्षमता

१. हिंदीतील उच्चारण क्षमता विशिष्ट उच्चार लक्षपूर्वक ऐकणे व बोललेले समजून घेणे.

२. हिंदीतील शब्दांचे उच्चार व शब्दातील विशिष्ट वर्णाखाली येणाऱ्या टिंबामुळे उच्चारात होणारा फरक काळजीपूर्वक ऐकणे व तसे बोललेले समजून घेणे.

३. उच्चार क लक्षपूर्वक ऐकणे.

आकलन क्षमता

१. संभाषणाचा आशय समजून घेणे.

२. कथा ऐकून तिचा आशय समजून घेणे.

३. कविता लक्षपूर्वक व रस घेऊन ऐकणे आणि तिचा आशय समजून घेणे

उपक्रम

१. हिंदीमध्ये 'ज्ञ' चा उच्चार 'ग्य' प्रमाणे केला जातो.
उदा. 'ज्ञान' चा उच्चार 'ग्यान' याचा सराव देणे.

२. हिंदीत ड व ढ यांचे दोन उच्चार आहेत. ज्यावेळी या दोन्ही अक्षरांच्या खाली टिंब म्हणजेच (नुक्ता) असेल तेव्हा वेगळा व नसेल तेव्हा वेगळा उच्चार करावयाचा असतो याचा सराव देणे.
उदा. डरना, डाक, बड़ा, पड़ाव, ढक्कन, ढोल, पढ़ना, बढ़ई.

३. खालील उच्चारांचा विशेष सराव द्यावा :
स-ष-श - सरिता, सुषमा, सुशील, बिभीषण, विशेषण
श-स-सर, शंकर, संकर.
छ-क्ष - कुछ, कक्षा, क्षेम, छिप्र
ड-ढ़ - कडाई, कढ़ाई, कड़ी, कढ़ी
ज जरा, (थोडा), ज़रा (वृध्दत्व)

४. सोप्या हिंदीतून मुलांशी संभाषण करणे.

५. सोप्या हिंदीमध्ये पाठ्यपुस्तकातील कथा सांगणे.

६. पाठ्यपुस्तकातील हिंदी कवितेचे भावपूर्ण व लयबध्द गायन-वाचन करणे.

७. सुमारे ४० ओळी (कविता) पाठ करणे.

२) क्षमता-भाषण-संभाषण

आपले विचार सोप्या व शुध्द हिंदीमध्ये व्यक्त करता येणे.

किमान क्षमता

१. शुध्द व स्पष्ट उच्चार करता येणे, उच्चार भेद लक्षात घेऊन बोलता येणे.

२. आपले घर, मित्र, नातेवाईक, शेजारी यांच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नांची सोप्या व शुध्द हिंदीत पूर्ण वाक्यात उत्तरे देता येणे.

३. सोप्या व शुध्द हिंदीत बोलता येणे आणि संभाषणात सहभाग घेता येणे.

४. प्रश्नांच्या उत्तराच्या रूपाने मुलांना कथा सांगता येणे.

५. मुलांना सोप्या व शुध्द हिंदीतून बोलता येणे व गप्पात भाग घेता येणे.

उपक्रम

१. मातृभाषेतील वर्णांचे हिंदीत होणारे भिन्न उच्चार शिक्षकाने स्वत: करून दाखविणे आणि विद्यार्थ्यांकडून ते करवून घेणे. अनेक उदाहरणे देऊन सराव करणे.
   उदा. हँसना, हंस (पक्षी)
   संसार - संसार (मराठी)

२. विद्यार्थ्यांना स्वत:संबंधी माहिती - घर, परिवार, मित्र, शेजारी शाळा यांच्यासंबंधी छोटे छोटे प्रश्न विचारणे व त्यांनी थोडक्यात यासंबंधी माहिती सांगणे.

३. चित्रांच्या सहाय्याने परिचित प्रसंग व ठिकाणे यांच्याबाबतीत संभाषण घडवून आणणे.

४. सोप्या हिंदीत पुस्तकातील कथा प्रथम सांगून त्यावर आधारलेले तोंडी प्रश्न विचारणे.

५. विद्यार्थ्यांच्या वयोगटाला अनुरूप आणि परिचित विषयावर त्यांच्याशी हिंदीत संभाषण करणे.

३) क्षमता

मुख वाचन (लाऊड रिडिंग) आणि मूक वाचन (सायलेन्स रिडिंग) करता येणे.

किमान क्षमता

१. हिंदीतील शब्दाचे शुध्द व स्पष्ट उच्चार करता येणे.

२. मातृभाषेतील त्याच वर्णांचा हिंदीत होणारा भिन्न उच्चार समजून घेऊन वाचन करता येणे.
   उदा. ऐ, औ, हिंदीतील जोडाक्षरांचे शुध्द उच्चार करून वाचता येणे.

३. अर्थ समजून घेऊन मूक वाचन करता येणे, वाचनाची गती वाढविणे.

उपक्रम

१. हिंदीच्या पाठ्यपुस्तकातील कथात्मक आणि वर्णनात्मक पाठाचे वाचन करवून घेणे.

२. पाठ्यपुस्तकातील संवादात्मक उता-याचे साभिनय वाचन करवून घेणे.

३. हिंदीच्या पाठ्यपुस्तकातील छोटासा परिच्छेद मनात वाचण्यास सांगणे.

४) क्षमता-पाठांतर

शुध्द भाषा विद्यार्थ्यांच्या तोंडी असणे आणि आशय समजून पाठांतर करणे.

किमान क्षमता

१. पाठ्यपुस्तकातील कविता योग्य चालीवर म्हणता येणे.

२. हिंदीच्या पाठ्यपुस्तकातील ४० ओळी पाठ म्हणता येणे.

उपक्रम

१. पाठयपुस्तकातील कविता व्यक्तिगत व सामुदायिकपणे योग्य चालीवर म्हणवून घेणे.
२. कविता पाठ म्हणण्यास सांगणे.

५) क्षमता - लेखन

आपले विचार सोप्या व शुध्द हिंदीमध्ये स्पष्टपणे लिहिता येणे.

किमान क्षमता

१. फळ्यावर दिलेला पाच ते दहा ओळींचा हिंदी उतारा आपल्या वहीत बिनचूक लिहून घेणे.
२. हिंदीमध्ये पूर्णविरामाचे चिन्ह दंडाच्या (।) स्वरूपात असते. तसे करण्याची सवय लावून घेणे.
३. वाक्यात स्वल्पविराम कोठे द्यावयाचा ते समजून घेऊन तसे करण्यास शिकणे.
४. पाठयपुस्तकाच्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे थोडक्यात, सोप्या व शुध्द वाक्यांत लिहिता येणे.
५. पाच ते आठ ओळीपर्यन्त हिंदीचे श्रुतलेखन, विरामचिन्हांचा वापर करून लिहिता येणे.
६. वर्षातून किमान आठ विषयांवर सोप्या व शुध्द हिंदीत लेखन करणे. दिलेल्या विषयांवर सात ते आठ वाक्ये लिहिता येणे.
७. १ ते १०० हे अंक अक्षरात शुध्द स्वरूपात लिहिता येणे.

उपक्रम

१. श्रुतलेखनाचा सराव देणे व त्यासाठी फळ्यावर छोटासा हिंदी उतारा लिहिणे.
२. पूर्णविराम वेगळ्या पध्दतीने देण्याची सवय लावणे.

३. स्वल्पविराम देण्याचा सराव देणे.
४. प्रश्नांची उत्तरे हिंदीत लिहिण्याचा सराव देणे.
५. हिंदीत श्रुतलेखन लिहिण्याचा सराव देणे.
६. विद्यार्थ्यांना वर्णनात्मक लेखनाचा सराव देणे व यासाठी त्यांच्या अनुभव विश्वातील विषयांची निवड करणे. (उदा. मेरा घर, मेरा खेत, मेरी पाठशाला, बगीचा, बाजार, सब्जीमंडी, डाकिया, गाय, तोता, कुत्ता इत्यादी).

व्याकरण

हिंदी भाषेच्या व्याकरणाचा विद्यार्थ्यांना स्थूल परिचय करून देणे.

सूचना :-

१. व्याकरण शिकविताना व्याख्येवर भर न देता प्रयोगात्मक भागावर भर द्यावा.
२. उद्गामी पध्दतीचा वापर करावा.

किमान क्षमता

१. उताऱ्यातील नामे ओळखता येणे.
२. वाक्यातील क्रियापद ओळखता येणे.
३. उताऱ्यातील सर्वनामे ओळखता येणे.
४. सर्वनाम ओळखून योग्य जागी त्याचा वापर करता येणे.
५. सर्वनामाची योग्य रूपे घालून वाक्ये लिहिता येणे.
६. विशेषण ओळखून योग्य जागी त्याचा वापर करता येणे.
७. हिंदी भाषेत फक्त दोनच लिंगे आहेत, स्त्रीलिंग व पुल्लिंग हे लक्षात घेणे.
८. लिंग बदलून शब्द लिहिता येणे.

९. वचन बदलून शब्द लिहिता येणे.

१०. कालभेद - सामान्य अपूर्ण -वर्तमान

सामान्य अपूर्ण - भूत

सामान्य भविष्य - स्थूल परिचय.

उपक्रम

१. उतारा देऊन त्यातील नामे ओळखण्यास सांगणे.

२. वाक्यातील क्रियापद ओळखण्यास सांगणे.

३. उतारा देऊन त्यातील सर्वनामे ओळखण्यास सांगणे.

४. उतारा देऊन त्यातील विशेषणे ओळखण्यास सांगणे.

५. नामाऐवजी सर्वनामे वापरावयास सांगणे. होणाऱ्या विकारांबाबतची चर्चा करणे.

६. दोन्ही लिंगाचे शब्द एकत्र देऊन वेगवेगळया लिंगाचे शब्द वेगळे करावयास ल सांगणे.

७. शब्दाचे लिंग बदलून शब्द लिहावयास देणे.

८. दिलेल्या शब्दांचे वचन बदलून लिहावयास देणे.

९. पाठ्यपुस्तकाच्या आधारे नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, लिंग आणि वचन यांच्यासाठी विविध उदाहरणे देऊन त्यांचा योग्य तो अभ्यास करवून घेणे.

१०. दिलेली वाक्य कोणत्या काळातील आहेत ते ओळखता येणे.

११. हिंदी वर्तनाच्या मानक नियमानुसार लेखनाचा सराव करणे.

यानुसार पाठ्यक्रमाचा आराखडा पुढीलप्रमाणे राहील :

१) गद्य - फक्त संहिता - ४० पृष्ठ.

२) पद्य - ८ ते १० ओळींच्या संस्कारक्षम आणि गेय कवितांचे स्थूल अध्ययन (राष्ट्रीय एकात्मता, बंधुत्व-भावना जागृत करणारी समूहगीते, फक्त समूहगान करण्यासाठी).

३) पुरवणी वाचन - पाठांतर ४० ओळीपर्यन्त

नीतिपर, सुबोध, सरस, छोटया छोटया गोष्टी असलेले एक पुस्तक (पृष्ठ संख्येची मर्यादा ४०)

४) व्याकरण - सूक्ष्म अध्ययन (पाठयपुस्तकावर आधारित)

नाम - लिंग, वचन, प्रकार, परिवर्तन प्रयोग-जातीवाचक, व्यक्तिवाचक प्रयोग

सर्वनाम - पुरूषवाचक, भेद-प्रश्नार्थक प्रयोग

विशेषण - गुणवाचक, संख्यावाचक (१ ते १०० पर्यन्त)

आज्ञार्थक - तू, तुम, आप - प्रयोग

काळ - वर्तमान - सामान्य, अपूर्ण } स्थूल परिचय
भूत - सामान्य, अपूर्ण
भविष्य - सामान्य

विरामचिन्ह - पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह.

हिंदी वर्ण लेखन - मानक नियमांचा स्थूल परिचय (तोंडी व लेखी)

५) रचना : मेरा परिचय, मेरा दिनक्रम, मेरी माँ, मेरी पाठशाला, मेरा मकान, मेरा खत, मेरा मित्र, मेरी सहेली, पालतू जानवर, मेरा पडोसी, बगीचा, बाजार-मुद्दांच्या आधारे लेखन (मेरा तेरा तुम्हारा, उसका, आपका यांचा प्रयोग करून रचना अपेक्षित)

६) लेखन कार्य - वर्षभराच्या कालावधीत अभ्यासलेल्या घटकांच्या संदर्भात कमीत कमी आठ विषयांवर ८ ते १० वाक्यांचे निबंध लिहिणे अपेक्षित आहे. श्रुतलेखन ४ परिच्छेद. अनुलेखन १० परिच्छेद.

७) मौखिक कार्य - वर दिलेल्या क्र. ५ च्या तोंडी माहिती अपेक्षित. पुरवणी वाचनासाठी असलेल्या पुस्तकाच्या आधारे कोणत्याही एका कथेचे साभिनय कथन.

विशेष सूचना :

१) " क्रमनिर्धारित भाषिक वाक्य संरचना तक्ता " आणि " केन्द्रभूत शब्दावली " कृपया क्रमश: परिशिष्ट १ व २ मध्ये पहा.

२) विद्यार्थी-केंद्रित पाठ्यपुस्तक तयार करण्याच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार आवडीनिवडीचा विचार करून पाठ्य-विषयाची निवड करण्यात यावी.

## इयत्ता ७ वी

या इयत्तेत हिंदीचे पाठ्यपुस्तक (संहिता) ५० पृष्ठांचे असावे. त्यात कथात्मक, संवादात्मक व वर्णनात्मक पाठ असावेत. गद्य पाठाव्यतिरिक्त ७० ओळींचे पद्य असावे. पाठांतर सुमारे ५० ओळींचे असावे.

१) क्षमता : श्रवण -

हिंदीतील विशिष्ट शब्दांचे उच्चार व सोपी वाक्ये यांचा अर्थ समजून घेऊन ऐकणे.

किमान क्षमता :

१) उच्चारानुसार फरक लक्षात घेणे. हा फरक लक्षपूर्वक ऐकणे व त्यातील फरक जाणणे.

२) हिंदीतून गोष्टी ऐकण्याची आवड निर्माण होणे.

उपक्रम :

१) खालील उदाहरणे नीट ऐकून समजण्याचा सराव देणे :

१. अंक, अंग, अँगुली, फँसना, - अं, अँ

२. आंदोलन, आँखे, - आं, आँ

३. इंदिरा, खिंचवा - इं, इँ

४. ईंट, चींटी - ई, ईं

५. कुंदा, उँगली - उं, उँ

६. ठूस - पूँछ - ऊँ

अनुस्वार व चंद्रबिंदू यांतील फरक स्पष्ट करणे.

२) सोप्या हिंदीतून मुलांना गोष्टी सांगणे.

२) क्षमता : भाषण - संभाषण

ऐकलेले विचार व स्वत:चे अनुभव शुद्ध व सोप्या हिंदीमध्ये व्यक्त करता येणे.

किमान क्षमता :

१) गोष्टीवरील प्रश्नांची उत्तरे देता येणे, गोष्टीला धरून विचार मांडता येणे.

२) व्यवहारात सोप्या हिंदीचा वापर करण्याची सवय लावणे. जीवनातील वेगवेगळ्या प्रसंगी हिंदीतून बोलता येणे.

३) स्पष्ट उच्चार करून हिंदीतून संभाषण करण्याची सवय लावणे.

४) १ ते १०० अंकांची आवृत्ती करून घेणे, लाखापर्यंत संख्या लिहिता येणे. क्रमवाचक अंकांचा परिचय करून घेणे.
अपूर्णांकांचे वाचन करता येणे.
(पहला, पहली, पहले, दूसरा, दूसरी, दूसरे)

उपक्रम :

१) शिक्षकाने पाठ्यपुस्तकातील गोष्ट योग्य प्रकारे सांगणे व त्यावर प्रश्न विचारणे.

२) व्यावहारिक शब्दांचा उपयोग करून बोलण्याचा सराव देणे.

३) हिंदीतून संभाषण करवून घेणे.

४) हिंदीतून बोलण्याचा सराव देणे.

५) लाखापर्यन्त लिहिलेले अंक वाचून दाखविता येणे, अपूर्णांक वाचता व लिहिता येणे.

३) क्षमता : वाचन -

मुख वाचन (लाऊड रिडिंग) आणि मूक वाचन (सायलेंट रिडिंग) करता येणे.

किमान क्षमता :

१) शुद्ध उच्चार, योग्य स्वराघात, आशयाप्रमाणे आवाजातील चढउतार, योग्य गती घेऊन तोंडी वाचन करता येणे.

२) कवितेतील आशय लक्षात घेऊन वाचन करता येणे :

१. आवाज न करता वाचन करणे,

२. वाचनाची गती वाढविणे.

३) वाचलेल्या उताऱ्याचे आकलन करून उत्तरे देता येणे.

४) वाचलेल्या भागातील मुख्य आशय सांगता येणे.

उपक्रम :

१) हिंदीच्या पाठ्यपुस्तकातील गद्य पाठाचे वाचन करून घेणे.

२) पाठ्यपुस्तकातील कवितांचे वाचन करून घेणे.

३) पाठ्यपुस्तकातील उताऱ्यांचे मूक वाचन करून घेणे.

४) मूक वाचनासाठी दिलेल्या पाठ्यपुस्तकातील उताऱ्यांवर प्रश्न विचारणे.

४) क्षमता : पाठांतर -

शुद्ध भाषा विद्यार्थ्यांच्या तोंडी बसणे आणि आशय समजून घेऊन एकच विचार सलगपणे मांडलेल्या अशा ८-१० ओळीपर्यन्त मर्यादित अशा किमान ५ उताऱ्यांचे पाठांतर करणे.

किमान क्षमता -

१) कवितांचे पाठांतर करून त्या गाऊन भावपूर्ण वाचन करून दाखविणे.

२) पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त एक हिंदी गाणे व दोन सामुहिक हिंदी गीते म्हणता येणे.

उपक्रम -

१) कविता (पाठ्यपुस्तकातील ४० ओळी) चालीवर पाठ करून घेणे.

२) वैयक्तिक व सामुहिक गाणी म्हणण्याचा सराव देणे.

५) क्षमता - लेखन :

आपले विचार सोप्या व शुध्द हिंदीमध्ये स्पष्टपणे लिहिता येणे.

किमान क्षमता -

१) फळ्यावरील उतारा आपल्या वहीत वळणदार अक्षरांत व बिनचूक लिहून घेणे.

२) अभ्यासिलेली जोडाक्षरे बिनचूक लिहिता येणे.

३) पूर्णविराम, स्वल्पविराम, अर्धविराम, प्रश्नचिन्ह यांचा उपयोग करून लिहिता येणे.

४) पाठ्यपुस्तकाच्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा सोप्या व शुध्द वाक्यांत लिहिता येणे.

५) ऐकलेली गोष्ट थोडक्यात लिहिता येणे.

६) दहा ते बारा वाक्यांत मुद्यांवरून गोष्ट लिहिता येणे.

७) जवळच्या नातलगांना पत्र लिहिता येणे,

८) हिंदीचे मातृभाषेत भाषांतर करता येणे.

९) इयत्ता ६ वी मध्ये शिकलेल्या विषयांवर अथवा पाठ्यपुस्तकातील काही विषयांवर आठ ते दहा ओळी हिंदीतून लिहिता येणे.

१०) आठ ओळी श्रुतलेखन विरामचिन्हांचा वापर करून लिहिता येणे.

११) कथालेखन, निबंधलेखन इत्यादी मिळून वर्षातून किमान दहा विषयांवर सोप्या व शुध्द हिंदीत लेखन करून घ्यावे.

उपक्रम :

१) वळणदार लेखनाचा सराव देण्यासाठी फळ्यावर हिंदी (पाच ते दहा ओळी) उतारा लिहिणे.

२) पाठ्यपुस्तकात आलेल्या जोडाक्षरांचे, वाक्प्रचारांच्या शब्दांचे योग्य प्रकारे, लेखन, (मानक, वर्तनी नियमानुसार करण्याचा सराव देणे)

३) विरामचिन्हांचा वापर करण्याचा सराव देणे.

४) पाठावरील आशयावर प्रश्न देऊन सोप्या भाषेत उत्तरे लिहिण्याचा सराव देणे.

५) ऐकलेल्या गोष्टी थोडक्यात लिहिण्याचा सराव देणे.

६) मुद्दे देऊन सोपी गोष्ट लिहिण्याचा सराव देणे.

७) घरगुती पत्रलेखन करण्याचा सराव देणे.

८) भाषांतर करण्याचा सराव देणे.

९) हिं काही परिचित विषयांवर हिंदीतून लिहिण्याचा सराव देणे.

१०) हिंदी शुध्दलेखनाचा सराव देणे.

व्याकरण :

हिंदी भाषेच्या व्याकरणाचा विद्यार्थ्यांना स्थूल परिचय करून देणे.

सूचना :

१) व्याकरण शिकविताना व्याख्येवर भर न देता प्रयोगात्मक भागावर भर द्यावा.

२) उद्गामी पध्दतीचा वापर करावा.

किमान क्षमता :

१) भाववाचक, समूहवाचक नाम व सर्वनाम - विकृतरूप ओळखता येणे.

२) क्रियापदाचा उपयोग समजून घेणे.

३) सामान्य अपूर्ण वर्तमानकाळ, सामान्य अपूर्ण भूतकाळ व भविष्यकाळ या तीन काळाचा सूक्ष्म परिचय करून घेणे.

४) काळाप्रमाणे क्रियापदांच्या रूपात कसा फरक पडतो ते समजून घेणे.

५) परिणामवाचक विशेषणे, सार्वनामिक विशेषणे ओळखता येणे. त्यांचा वाक्यात उपयोग करता येणे.

उपक्रम :

१) पाठात आलेल्या नामांची व सर्वनामांची निवड करून घेणे.

२) कर्ता व क्रियापदाची योग्य रूपे वापरून वाक्य जुळवावयास सांगणे.

३) तिन्ही काळातील प्रसंग देऊन माहिती सांगणे. क्रिया केव्हा घडली याबाबत चर्चा घेणे.

४) तीन काळांची रूपे देऊन क्रियापदांच्या रूपांच्या जोड्या जुळविणे. हा व्यवसाय घेणे.

५) काही वाक्ये, त्यातील नामे व त्यांची विशेषणे ओळखण्यास सांगणे.

यानुसार पाठ्यक्रमाचा आराखडा पुढीलप्रमाणे राहील :

<u>पाठ्यक्रम (पूर्ण)</u>

१) गद्य : फक्त संहिता - ५० पृष्ठे

२) पद्य : सूक्ष्म अध्ययनासाठी - ५० ओळी. प्रत्येकी १० ते १२ ओळींच्या संस्कारक्षम आणि गेय कविता

पाठांतर - ५० ओळीपर्यन्त (समूहगीते धरून)

स्थूल अध्ययन : समूहगीते - राष्ट्रीय एकात्मता, बंधुत्व भावना जागृत करण्याची क्षमता असलेली २ समूह गीते. फक्त समूह गायनासाठी (प्रत्येकी १० ते १५ ओळी)

३) पुरवणी वाचन - देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, शौर्य या विषयांवर नीतिपर, सुबोध गोष्टींचे एक पुस्तक (पृष्ठसंख्याची मर्यादा ५०)

४) व्याकरण :

पूर्व ज्ञान, आवृत्ती, अव्यय शब्दभेद

नाम - भाववाचक, समूहवाचक

सर्वनाम - सर्व प्रकार, सामान्य रूप

विशेषण - परिणामवाचक, सार्वजनिक, क्रमवाचक, अंक लाखापर्यन्त, अपूर्णांक

अविकारी - शब्दासमवेत विभक्ती प्रत्ययांचा उपयोग
पूर्वकालीन कृदंत प्रयोग, सकर्मक, अकर्मक क्रियापदे

विशेष प्रयोग - सकना, चाहना, जब, तो, तब, या, जहाँ, वहाँ, तक इसलिए, क्योंकि, इसीलिए, कि, परंतु, किंतु

विरामचिन्हें : अर्धविराम, उद्गार चिह्न, अवतरण चिह्न

हिंदी वर्णलेखन : मानक नियमांचे लेखन कार्यात पालन.

५) रचना :

कथा लेखन - रूपरेषेच्या आधारे (१० ते १२ वाक्यांमध्ये)

संभाषण - संवादलेखन (१०-१२ वाक्यांमध्ये)

पत्रलेखन - मित्र, भाऊ, बहिण, यांच्या नावे (थोडक्यात)

निबंध लेखन - अभ्यासलेल्या धड्यांच्या संदर्भात वर्णनात्मक, विवरणात्मक (१५ वाक्यांमध्ये)

भाषांतर - सोप्या हिंदी वाक्यांचे मातृभाषेत भाषांतर.

६) लेखी काम :

रचना (५) च्या संदर्भात कमीत कमी १० रचना

(प्रत्येक प्रकाराची कमीत कमी एक रचना अपेक्षित)

श्रुतलेखन - ५ परिच्छेद, अनुलेखन - १० परिच्छेद.

७) तोंडी काम -

वक्तृत्व, कथाकथन, पाठांतर केलेल्या कवितेचे वाचन, परिच्छेद वाचन कमीत कमी तीन चढाओढीमध्ये सहभाग आवश्यक.

विशेष सूचना :

१) " क्रमनिर्धारित मौखिक वाक्य संरचना तक्ता" आणि " केन्द्रभूत शब्दावली " कृपया क्रमश: परिशिष्ट १ व २ मध्ये पहा.

२) विद्यार्थी केंद्रित पाठयपुस्तक तयार करण्याच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार आवडीनिवडीचा विचार करून पाठयाविषयाची निवड करण्यात यावी.

## परिशिष्ट - इ

सम्पर्क भाषा - हिन्दी संबंधी कुछ पुस्तकें तथा समाचारपत्रमें प्रसिध्द हुये विचारोंका संकलन

हिन्दी भाषा की सहायता से भारतवर्ष के विभिन्न प्रदेशोंमें बिखरे हुए लोग जो ऐक्य बंधन स्थापित कर सकेंगे, वास्तवमें वे ही सच्चे भारतीय कहलाने योग्य हैं।

(बंकिमचंद्र चटर्जी के ` बंग-दर्शन ` नामक ग्रंथ के पाँचवे खंड से)

मेरी समझमें हिन्दी भारतकी सामान्य भाषा होनी चाहिए। जब एक प्रान्त दूसरे प्रान्तसे मिले, तो आपस में विचार-विनिमय का माध्यम हिन्दी क ही होनी चाहिए।

- बाल गंगाधर तिलक
(१९२०, बनारसके भाषणसें)

` देश के सबसे ज्यादा हिस्से में हिन्दी ही लिखी जाती है। अगर हम साधारण बुध्दिसे काम लें तभी हमें पता चलेगा कि हमारी कौमी जबान हिन्दी ही हो सकती है। `

- श्रीमती सरोजिनी नायडू

जैसे अंग्रेज अपनी मातृभाषा अंग्रेजी में बोलते हैं, और सर्वथा उसे ही व्यवहार में लाते हैं वैसे ही मैं आपसे प्रार्थना करता हूँ कि आप हिन्दी को भारतमाता की एक भाषा बनाने का गौरव प्रदान करें। हिन्दी सब समझते

हैं। इसे राष्ट्रभाषा बनाकर हमें अपने कर्तव्य का पालन करना चाहिए।

- महात्मा गांधी

✓ हिन्दी भारत की एकता का प्रतीक है और इसका प्रचार एवं विकास करना हम सबका कर्तव्य है। हिन्दी की सफलता हिन्दी-भाषी क्षेत्रों मे मिली सफलता पर नही अपितु अहिन्दी-भाषी क्षेत्रों में मिली सफलता पर निर्भर है। हम हिन्दी को समस्त देश में एक देश को समझने तथा विचार-विनिमय करने की भाषा सम्पर्क भाषा बनाना चाहते है।

- म.क. छागला
(१८ वी शिक्षा समिति के अध्यक्षीय भाषण में)

हमारी जडें जननी-जन्मभूमि की भाषा और संस्कृति में है। जडों के यथाचित सिंचन से ही हमारी अंतरनिहित शक्तियों का विकास होता है आन्तरिक भावनाओं और विचारों की अभिव्यक्ति उत्तेजित होती है, अपनी पहचान होती है, मानवता के दर्शन होते है। अपनी जन्मभूमि, भाषा और संस्कृति से कटा हुआ आदमी बौना पड जाता है। भाषा केवल ध्वनियों, अक्षरों और शब्दों का समूह मात्र नही बल्कि हमारे दिलों की धडकन और प्राणों का स्पन्दन है। भाषा हमारा अभिमान है, आत्मसम्मान है।

- डॉ. बलराम जाखड
लोकसभा अध्यक्ष

यह यथार्थता है कि हिन्दी के अलावा और कोई भाषा भारत की सम्पर्क भाषा नही हो सकेगी। यह यथार्थता इस मिट्टी में समाई हुई है। इसमें संदेह नही कि यह यथार्थता अंकुरित होगी और एक बडा वृक्ष बनकर पल्लवित-पुष्पित होगी।....यदि हिन्दी को हमें जोडने वाली भाषा बनाना है तो सरकारी को

बहुत बडा दायित्व निभाना है । .... विविध भाषा-भाषी भारतीयों का आपसी सम्पर्क हिन्दी के माध्यम से ही हो सकता है । हिन्दी समझने वालों की संख्या बहुत अधिक है ।

- देशिकोत्तम डॉ.जी. रामचन्द्रन
गांधी ग्राम विश्वविद्यालय मदुरै के भू. कुलपति
(दिनांक १६-२-१९८६ को केरल हिन्दी प्रचार-सभा में दिए गए उद्घाटन भाषण में)

भविष्य में हिन्दी आने वाली नवीन चेतना की सांस्कृतिक भाषा होगी, ऐसा मेरा विश्वास है । अंग्रेजी में बौध्दिक सक्रियता और बौध्दिक आलोचना के तत्व हैं, पर सांस्कृतिक अर्थ में वह अंतर्राष्ट्रीय नहीं है । हिन्दी में जो ध्वनि-संगीत है, जो शांति की सूक्ष्म झंकार परिव्याप्त है, जो पवित्रता है, वे बेजोड है । भावी मनुष्यत्व के तत्वों से हिन्दी परिपूर्ण होगी । भविष्य में संस्कृति का जो नवीन संचारण होगा, उसे हिन्दी अपने में समाहित करेगी । आने वाले युग की संस्कृति में जिन गुणों का समावेश होगा, वे गंभीर, व्यापक और उच्च स्तर के होंगे । नवीन संस्कृति को व्यक्त करने के लिए भाषा झरने की तरह फूट निकलेगी । भाव उमड-उमड कर आएँगे । हिन्दी भाषा का सौन्दर्य क ही कुछ विलक्षण है ।

मुझे विश्वास है कि एक दिन आएगा जब हिन्दी विश्व की सांस्कृतिक भाषा होगी ।

- सुमित्रानन्दन पन्त

हिन्दी भारत की विभिन्न भाषाओं के साथ प्रत्येक हिन्दीतर राज्य में सम्पर्क का सशक्त माध्यम होकर हमारी राष्ट्रीय संस्कृतिका सार्थवाह है । गिल-

क्राइस्ट के पूर्व भी हिन्दी के दो रूपों का वर्णन किया गया है - शुद्ध हिन्दुस्तानी और मिश्रित हिन्दुस्तानी। मेरे मत में मिश्रित हिन्दुस्तानी से तात्पर्य सम्पर्क-भाषा हिन्दी से ही था।

- कल्याणमल लोढा
मू. प्रोफेसर तथा अध्यक्ष
कलकत्ता विश्वविद्यालय, कलकत्ता

२ ए, देशप्रिय पार्क (ईस्ट)
कलकत्ता-७०० ०२९

सांस्कृतिक, धार्मिक, राजनीतिक, व्यापारिक एवं साहित्यिक कारणों से हिन्दी भषा आंतर भाषा के रूप में विकसित हुई और उत्तरोत्तर समृद्ध होती चली गई और आज से पाँच-छह शताब्दियों से पूर्व उत्तर में बदरी विशाल से दक्षिण में रामेश्वरम् तक और पश्चिम में द्वारिका से पूर्व में कामाख्या तक सभी तीर्थ स्थानों और सांस्कृतिक केन्द्रों में यह भाषा बोली और समझी जाती है। बंगाल के वैष्णव भक्तों की ब्रजबुलि, महाराष्ट्र के नामदेव, तुकाराम, एकनाथ, आदि सन्तों की हिन्दी बानी, पंजाब के सिख गुरुओं की हिंदी पदावली, दक्षिण भारत की मुसलमानी रियासतों की दकिनी (दक्खिनी) और गुजरात के कवियों की हिन्दी रचनाएँ, हिन्दी की इस सार्वदेशिक व्याप्ति को प्रमाण है।

- डॉ. अम्बाशंकर नागर
निदेशक,
हिन्दी गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद

हिन्दी भारत की राजभाषा है और उसे देश मे लोग सम्पर्क भाषा के रूप में प्रतिष्ठित मानते है। भारतीय भाषाओं से परस्पर आदान-प्रदान का सार्वभौम माध्यम राष्ट्रीय स्तर पर हिन्दी हो सम्पर्क का मेरी दृष्टि मे यही आशय है। देश के भीतर हिन्दी सम्पर्क-भाषा है किन्तु विश्व के मंचपर वह भारत के मूल व्यक्तित्व की अभिव्यक्ति काम माध्यम है। भारत की सभी भाषाएँ श्रीसम्पन्न है और गुण-धर्म से मंडित है। हिन्दी देश के हृदय प्रदेश की

भाषा है और अधिकाधिक जनों की वाणी । हिन्दी का जन्म ही सम्पर्क से हुआ है और उसके विकास की कहानी यौगिक रही है । जोडने का काम कठिन है यह कार्य हिन्दी सदा से करती रही है । अंग्रेजी कभी भी भारत के लिए सम्पर्क की भाषा नही थी और सदा से वह साम्राज्य विस्तार की भाषा के रूप मे प्रयुक्त हुई । आज भी विश्व के रंगमंच पर अंग्रेजी सम्पर्क-भाषा के रूप मे कारगर तो है किन्तु वह हृदय में स्नेह, सद्भाव तथा मानवीय मूल्य की प्रतिष्ठा मे अकिंचन रही है ।

हिन्दी संसार के लगभग १०० विश्वविद्यालयो में पढाई जा रही है और संसार यह मानने लगा है कि भारत की पहचान हिन्दी के माध्यम से ही तत्वाभिनिवेषणी रूप में हो सकती है । सम्पर्क-भाषा राजकाज मे होना बडी बात है किंतु उससे बडी बात है कि औरों का हृदय जीतकर सबके भीतर सामरस्य की प्रतिष्ठा । इसमें भी हिन्दी सफल हुई है । हिन्दी अन्य भारतीय भाषाओं के अभ्युदय में ही अपने विकास की सार्थकता मानती है इसलिए हिन्दी सारे देश की वाणी है तथा लोकमंगल और कल्याण उसका गुणधर्म । अपने गुणधर्म और निष्ठा के कारण हिन्दी केवल राष्ट्र मंगला ही नही लोक मंगला बनने कि शक्ति से मंडित है ।

मुझे विश्वास है कि दिनोंतर हिन्दी के माध्यम से राष्ट्र जो अनुष्ठान करेगा वह सफल, सुफल और मंगलमूलक होगा ।

= सुधाकर पाण्डेय
प्रधानमंत्री
नागरी प्रचारणी सभा
नई दिल्ली

✓ आज हिन्दी केवल हिन्दी प्रदेश की भाषा न होकर पूरे देश की भाषा हो गई है। आज नहीं, शताब्दियों पहले ही हिन्दी एक अखिल भारतीय सम्पर्क माध्यम के रूप में विकसित हुई है। राष्ट्रीय आंदोलन के संदर्भ में तो हिन्दी भाषा ने पूरे देश को एकता के सूत्र में बाँधने की सशक्त कड़ी के रूप में महत्वपूर्ण भूमिका अदा की है। हिन्दी साहित्य की समृध्दि में हिन्दी भाषी साहित्यकारों के अलावा हिन्दीतर प्रदेशों के विभिन्न साहित्यकारों, लेखकों और राष्ट्रीय नेताओं ने बहुत बड़ा योगदान किया है। ठीक ही, भारतीय संविधान के निर्माताओं ने यह परिकल्पना की है कि हिन्दी भारतीय सामासिक संस्कृति की अभिव्यक्ति की वाहिका बनेगी।

- डॉ. मलिक मोहम्मद
अध्यक्ष,
तकनीकी तथा वैज्ञानिक शब्दावली
आयोग
(मानव संसाधन मंत्रालय, भारत
सरकार), नई दिल्ली

'सम्पर्क भाषा' के लिए शुभ संदेश स्वीकार करें।

यदि सम्पर्क-भाषा एक ओर जन के लिए राष्ट्रीय-अंतर्राष्ट्रीय सिक्के का काम करती है, तो दूसरी ओर भाषाविशेषज्ञों के लिए भी चुनौती पेश करती है कि वे सम्पर्क-भाषा के नाम पर देश में किसी भी प्रकार का अलगाव न पनपने दें।

'सम्पर्क' का एक अर्थ 'मेल-जोल' और 'मिलाप' है तथा एक 'मिश्रण' है। राष्ट्रीय स्तर पर जो भाषा मेल-जोल कराए और विभिन्न भाषा-भाषियों का मिलाप कराए, वह सम्पर्क-भाषा हुई। सम्पर्क-भाषा में चारों ओर से आए हुए तत्वों का मिश्रण भी होना चाहिए। हिन्दी भाषा देश-विदेश की अनेकानेक भाषाओं में बहुत से शब्दों को अपनी

आवश्यकताओं की पूर्ति के लिए निरंतर आत्मसात करती जा रही है। सम्पर्क भाषा किसी भाषा की विरोधी नहीं होती। सामान्यतया उसे 'बनाने' की जरूरत नहीं पडती, वह स्वयं 'बन' जाती है - ज्यादा से ज्यादा लोगों को मिला सकने के गुण के कारण। उसका बहिष्कार करने वाले क्षेत्र उसके अभाव के कारण राष्ट्रीय धारा से अलग केवल अपने क्षेत्र में सीमित होकर रह जाते है। इसलिए सम्पर्क-भाषा का आदर करना अपने बडे स्वार्थ की ही पूर्ति है - और राष्ट्रीय एकता में योग देना तो है ही।

- रमेशचन्द्र महरोत्रा
भाषाविज्ञान-विभाग
रविशंकर विश्वविद्यालय
रायपुर-४९२ ०१०

हिन्दी की गति पवित्र गंगा के समान प्रवाहमान है। न शिव और शिवालिक उसे रोक पाये और न जन्हु जैसे समर्थ बुद्धिजीवी ऋषि उसे टोक पाये। वह आकाश से उतरी और जन-समुद्र में मिल गई। हिन्दी भी वन, प्रांतरों पहाडों और देश-विदेशों की सीमाओं को लांघती हुई एक दिन विश्व मंच पर स्थापित होगी और इसका सबसे बडा कारण होगा विश्व के मानवों की उसमें अवगाहन की उत्कृष्ट अभिलाषा और हिन्दी मन्दाकिनी का मानवता के समुद्र में अपने को विसर्जन करने का पुनीत लक्ष्य। मन्द-मन्द गति से लोल लहरें लेती हुई हमारी हिन्दी-गंगा इस नये गंगा सागर की ओर हर्षपुलक से भरी हुई चली जा रही है और चली जा रही है।

- गोपाल प्रसाद व्यास

कोणतेही राष्ट्र हे राष्ट्रभाषेशिवाय राष्ट्र म्हणून उभे राहू शकत नाही. राष्ट्रभाषेचे रक्षण हे देशाच्या सीमेच्या रक्षणाइतकेच महत्त्वाचे असते. कारण राजकीय आक्रमणाच्यावेळी राष्ट्रभाषाच, देशाचे अभेद्य पर्वतावत रक्षण करत असते. आयरिश कवी थॉमस डेविसच्या या उद्गारातील गांभीर्य आपण पुरते ओळखले असे म्हणणे धाडसाचे होईल.

भारतासारख्या बहुभाषिक राष्ट्रात एकात्मता निर्माण करण्याचे कार्य करू शकण्याची क्षमता असलेल्या या भाषेचा जाणीवपूर्वक वापर करण्याची गरज आहे. हिंदी ही भारतीय जनमानसाची भाषा होईल. तेंव्हाच ती ख-या अर्थाने राष्ट्रभाषा होईल. महात्मा गांधी नेहमी म्हणायचे, ` राष्ट्रभाषा बिना मेरा राष्ट्र गूँगा है । ` महात्माजींचे हे शल्य दूर करण्यासाठी देश अभेद्य व एकसंघ राखण्यासाठी आपण सर्वांनी एक राष्ट्रकार्य म्हणून हिन्दी भाषेचा व्यापक प्रचार व प्रसार करायला हवे तरच राष्ट्रभाषा म्हणून हिन्दी गतिशील राहील व उत्तरोत्तर तिचा विकास होईल.

- दैनिक सकाळ,
हिंदीचा प्रचार व प्रसार राष्ट्रकार्य
म्हणून व्हावा
प्रा. डॉ. सुनीलकुमार लवटे
दिनांक १३ सप्टेंबर १९८७

इंग्रजी भाषेचा आग्रह कायम आहे आणि तो वाढला आहे. त्यामुळे इंग्रजी भाषेच्या अभ्यासाची कालमर्यादा कमी करता येणार नाही. आता राहता राहिली हिन्दी भाषा. या भाषेच्या शिक्षणाबाबत राष्ट्रीय पातळीवर अद्याप ठाम धोरण दिसत नाही. त्यामुळे हिंदी राष्ट्रभाषा असूनही तिला गौण स्थान प्राप्त झाले आहे. परंतु राष्ट्रभाषा म्हणून तिचे स्थान निश्चित झाले पाहिजे. उच्च शिक्षण राष्ट्रभाषेत घेता आले पाहिजे.

- दैनिक पुढारी,
त्रिभाषा सूत्र : एक चिकित्सात्मक
दृष्टिक्षेप
म.अ. तांबोळी
दि. ११ जून १९८७

हिन्दी ही भारताची राष्ट्रभाषा ३० देशातील १०० हून अधिक विद्यापीठात शिकविली जाते.

| | | | |
|---|---|---|---|
| अमेरिका | ... | २४ | विद्यापीठे |
| पश्चिम जर्मनी | ... | १३ | ,, |
| जपान | ... | १० | ,, |
| रशिया | ... | ६ | ,, |
| इटाली | ... | ३ | ,, |
| बेल्जियम | ... | ३ | ,, |
| नेदरलँड | ... | २ | ,, |
| पोलंड | ... | २ | ,, |
| ब्रिटन | ... | २ | ,, |
| स्वित्झर्लन्ड | ... | २ | ,, |

हे हिंदी शिकविणारे काही प्रमुख देश आहेत. सध्या जगातले ४५ कोटींहून अधिक लोक हिंदी बोलतात व त्यांना हिंदी समजते. असे येथील एका इंग्रजी नियतकालिकेने म्हटले आहे.

महाराष्ट्र टाईम्स
१८-११-१९८७